**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाखाली अर्ज**
**क्र.२४/२०23 मधील निशाणी क्र. २४ वरील आदेश**
प्रियांका रविंद्र निकम वि. रविंद्र अमृता निकम इ.०१

( पारीत दिनांक – १२/०२/२०२४)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी निशाणी क्र. ५ अन्वये झालेल्या अंतरिम आदेशामध्ये किरकोळ स्वरुपाचा बदल मागणेकरीता दाखल केला आहे.

२. अंतरिम अर्जातील आदेशानुसार या न्यायालयाने गैरअर्जदार यांनी त्यांचे मुलांना अर्जदार यांची भेट घडवण्याकरीता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस–या रविवारी व्यवस्था करणेबाबत आदेशित केले होते. त्याचे पालन गैरअर्जदाराने केलेले नाही. सबब, अर्जदार हे प्रस्तुत अर्जान्वये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस–या रविवार ऐवजी पहिल्या व तिस–या शनिवारी न्यायालयीन वेळेत मुलांना हजर ठेवणेकरीता गैरअर्जदार क्र. १ यांना आदेश करावेत अशी विनंती करत आहेत.

३. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दि. ०५/०२/२०२४ रोजी प्रकरण बोर्डावर नसताना ते बोर्डावर घेण्याचा अर्ज देवून दाखल केला आहे. सदर अर्जाची नोटीस गैरअर्जदार क्र. १ यांना काढण्यात आली व त्यानुसार आजची तारीख नेमण्यात आली आहे. सदर तारखेचा उल्लेख गैरअर्जदारांना काढलेल्या नोटीसीत करण्यात आला आहे. आज गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या दोन्ही मुलांसह न्यायालयामध्ये हजर आहेत. प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याकरीता गैरअर्जदार क्र. १ यांना विचारण्यात आले असता, त्यांनी ते त्यांच्या वकीलांना बोलावणार नसल्याचे तसेच सदर अर्जावरती कोणतेही म्हणणे देणार नसल्याचे सांगून न्यायालयाने योग्य तो आदेश पारित करावा असे तोंडी कथन

केले आहे.

४. अर्जदार तर्फे विधिज्ञ श्री. ए.जे.देसाई व अर्जदार स्वतः हजर. गैरअर्जदारतर्फे विधिज्ञ गैरहजर व गैरअर्जदार क्र. १ स्वतःहजर.

५. निशाणी क्र. ५ खालील आदेशाचे अवलोकन करता, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या दोन्ही अपत्यांना अर्जदार यांची भेट घडवून आणण्याबाबत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस–या रविवारी व्यवस्था करण्यात यावी असे गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात आले आहे असे दिसते. तथापि, प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार यांची मागणी ही रविवार ऐवजी शनिवारी नेमण्यात यावी अशी आहे. सदर अर्जावर गैरअर्जदार यांनी कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही अथवा हरकत घेतलेली नाही. मुलांची भेट घडवण्याकरीताचा न्यायालयाचा आदेश अद्याप अस्तित्वात आहे. त्यामुळे, रविवार ऐवजी शनिवार असा बदल केल्यास कोणताही मोठा बदल अंतरिम आदेशात होणार नाही. सबब, अर्जातील संपूर्ण परिस्थितीचा विचार करता, खालीलप्रमाणे आदेश करणे योग्य राहील. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेः–

**– आ दे श –**

१) गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या दोन्ही अपत्यांना अर्जदार यांना भेटण्याकरीता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस–या शनिवारी न्यायालयीन वेळेत न्यायालयात हजर ठेवावे.

स्वाक्षरी/–.

कागल.

**(अमोल भारत जवळे)**

दिनांक – १२/०२/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. २, कागल.